# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/२०२२** **दिनांक ०२.११.२०२२**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ३.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची विशेष सभा बुधवार दि.०२/११/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२९५७/२०२२, दि.२९.१०.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.०२/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी सभेकरीता उपस्थित होते.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्री.राहूल जाधव,**
  **उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
  **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५४८** **सदरचे निर्णय हे पुर्वीचे व्यवस्थापन समितीने घेतलेले असल्याने त्यांचे पुर्ण अवलोकन करणे गरजेचे आहे व आजचे सभेतील तातडीचे विषयांचा विचार करता तेवढा वेळ उपलब्ध नसल्यामुळे सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **दि.१८.१०.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५४९** **दि.१८.१०.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. त्याची पूर्तता व पाठपुरावा याबाबत खालील प्रमाणे चर्चा झाली.**

**निर्णय क्र.५३३ - मधील भाग-१ ई-निविदा अमान्य केल्याचा निर्णय कायम केला आहे. आधारभुत किंमत ठरविणे ही बाब प्रशासकीय कार्यक्षेत्राच्या बाहेरील बाब आहे. त्यासाठी व्यवस्थापन समितीकडून मंजूरी घेणे किंवा आदेश घेणे आवश्यक होते. त्यामुळे निविदा अमान्य करण्याचा निर्णय कायम झाला.**

**भाग-२– अभ्यास करुन नविन फेर प्रस्ताव समितीपुढे सादर केलेला नाही. पुर्तता केलेली नाही. नविन प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यास होणा-या विलंबास प्रशासन स्वत: जबाबदार राहणार आहे.**

**भाग-३– अटी व शर्ती नियमाप्रमाणे न घालता चार वेळा ई-निविदा काढण्यासाठी जबाबदार व्यक्ती विरुध्द अनुशासनात्मक कार्यवाहीचा अहवाल आलेला नाही. सदरचा अहवाल एक आठवडयाचे आत अध्यक्ष व समिती सदस्य यांना पाठविण्यात यावा.**

**भाग-४ – १००० क्विंटल खरेदी केलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली.**

**भाग-५- जीईएम पोर्टलवर अद्याप नोंदणी करुन घेतली नाही. अशी माहिती दिली.**

**जीईएम रजिस्ट्रेशनच्या बाबतीत जरी जीईएम प्रणालीमध्ये तुप उपलब्ध नाही तरी ती प्रणाली स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी आवश्यक असल्यामुळे नोंदणी करुन घेण्याचे निर्देश दिले. परंतु दोन आठवडे होऊन गेले तरी त्यावर आवश्यक कार्यवाही व पुर्तता झालेली नाही. त्यामुळे आवश्यक इतर साहित्य खरेदीमध्ये विलंब झाल्यास प्रशासनातील संबधीतांना जबाबदार धरण्यात येईल.**

**निर्णय क्र.५३४ व ५३६, ५३८, ५३९, ५४०,५४२,५४३,५४५,५४७ कायम करण्यात आला.**

**निर्णय क्र.५३५ कायम केला आहे. परंतु जीईएम रजिस्टेशनच्या बाबतीत उपरोक्त निर्णय लागु राहिल.**

**निर्णय क्र.५३७ कायम करण्यात आला. पाठपुरावा येणे बाकी आहे. आजचे विषयसुचीमध्ये सदर विषयाचा समावेश आहे. असे सांगण्यात आले.**

**निर्णय क्र.५४० कायम करण्यात आला. पुर्तता अहवाल येणे बाकी आहे.**

**निर्णय क्र.५४१ कायम करण्यात आला. पाठपुरावा येणे बाकी आहे. आजचे विषयसुचीमध्ये सदर विषयाचा समावेश आहे. असे सांगण्यात आले.**

**निर्णय क्र.५४६ कायम करण्यात आला. पाठपुरावा बाकी आहे.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.३** **श्री साईबाबा रुग्णालयामध्ये नव्याने सुरु होणा-या कॅन्सर विभागामध्ये केमोथेरपी करीता आवश्यक असणारे औषधे खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५८,४२,०१०/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५५०** साईबाबा सुपरस्पेशालीटी रुग्णालयात या नवीन विभागासाठी पुरेसी जागा आहे काय याची माहिती घेणे आवश्यक आहे. व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समितीला पुर्व कल्पना न देता त्यांचे मार्गदर्शन न घेता तसेच टाटा मेमोरिअल कॅन्सर सेंटर वैगरे सेवा भावी संस्था यांचे मार्गदर्शन न घेता, त्यांचे कायशैलीचा अभ्यास न करता, औषध उत्पादकाकडून दर न मागविता प्रशासनीक स्तरावर नाशिकचे फक्त दोन डीलर कडून दरपत्रक मागवुन हा प्रकल्प तयार करुन प्रस्ताव समितीसमोर ज्या पध्दतीने ठेवला त्यास समिती सदस्य श्री.भोसले व अध्यक्ष श्री.यार्लगड्डा यांनी आक्षेप नोंदविला आहे. या दोन डीलरला कशाचे आधारे दर निश्चीत करण्यासाठी निवडले आहे. याचा खुलासा मागविण्यात यावा. बजेटमध्ये यासाठी तरतुद टस्ट फंड मध्ये केली याचा उल्लेख नाही. समिती सदस्य व अध्यक्ष यांचे मते सदर प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.४** संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HMIS व PACS सिस्टीम खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.५५१** समितीचा अहवाल सादर केलेला नाही. फक्त कार्यालयीन टिपणी सादर केली. त्यामुळे मागील निर्णयाची पुर्तता झालेले नाही. म्हणून पुर्तता करुन पुन्हा सादर करावे.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.५** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकारी रिक्त पदे जाहिरातीव्दारे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेबाबत.

**निर्णय क्र.५५२** मुलाखत घेणेकामी प्रस्तावीत निवड समितीमध्ये अ.क्र.१ वर शेवटी 'किंवा ते मनोन्वीत करतील ते सदस्य' हा मजकुर वाढविण्यात यावा. तसेच अ.क्र.४ विभागप्रमुख (मेडीसीन) ए.एफ.एम.सी., पुणे यांचे ऐवजी जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचा समावेश करण्यात यावा.

गुणतालीका तक्त्यातील अ.नं.१ साठी २०% गुण ठेवण्यात यावेत. अ.नं.६ वर बेडसाईट परफॉर्मन्ससाठी २० गुण ठेवण्यात यावेत. अ.नं.७ वर वैयक्तीक मुलाखतीकरीता २० गुण ठेवण्यात यावेत. निवड समितीतील प्रत्येक सदस्यांने एकुण गुणांपैकी गुण दयावेत व त्यानंतर त्या गुणांची सरासरी काढण्यात यावी.

निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यावर त्यांना प्रत्यक्ष नियुक्ती देण्यापुर्वी मंजूरीसाठी समितीपुढे सादर करावे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.६** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,६३,९५८/- मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५३ सदर कर्मचा-यांनी मेडीक्लेम किंवा इतर मार्गाने प्रतिपुर्ती करुन घेतली नाही याचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही. म्हणून त्याची खात्री करुन प्रतिज्ञापत्र घेऊन प्रस्ताव पुन्हा सादर करावा. तसेच असे निदर्शनास आले की, अर्जदारपैकी काही जण संस्थानचे हॉस्पिटलमधील अधिकारी किंवा कर्मचारी आहेत. आणि त्यांनी ज्या पध्दतीने बाहेरील दवाखान्यातून स्वत: किंवा कुटूंबीयांचे सुश्रुषा करुन घेतली, जरी नावासाठी कादगपत्रांची पुर्तता दाखविली तरी त्यांचे मनात आपले दवाखान्यात मिळणारी सुश्रुषेवर विश्वास नाही, असा संदेश दिसत आहे. जर आपल्याचा रुग्णालयातील कर्मचा-यांना आपल्याच दवाखान्यावर विश्वास नाही तर ती गोष्ट गंभीर आहे. याचा विचार विभागप्रमुख / संबधीत प्रशासकीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्षात घेऊन दवाखान्याचा स्तर वाढविण्यासाठी पाऊले उचलून प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

श्री. जाधव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने सदस्य म्हणून मत मांडले की, यापैकी कोणी अर्जदार यांनी संस्थानचे दवाखान्यात सोई उपलब्ध असतांना देखील चुकीच्या पध्दतीने बाहेरील दवाखान्यातून इलाज करुन घेतला आणि त्यासाठी संस्थानचे दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी यांनी मंजूरी दिली तर त्यांचेवर आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. यास समिती अध्यक्ष व सदस्य यांनी अनुमोदन दिले. या संबधी कारवाईचा कृती अहवाल पुढील बैठकीत सादर करावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.७ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,३२,३५५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५४ या प्रस्तावातील परिच्छेद १ व २ मध्ये जी माहिती दिली आहे त्यावरुन सदर सवलत रिटी पिटीशन ३१३२ प्रमाणे आहे किंवा वेगळी व्यवस्था आहे याचा काही बोध होत नाही. तसेच समितीने दि.२६.०६२०१४ रोजी जो निर्णय दिला आहे त्यात बदल करुन सप्टेंबर, २०१७ मध्ये तत्कालीन मुख कार्यकारी अधिकारी यांनी वेगळा जो निर्णय दिला आहे. तो निर्णय देखील सभेसमोर ठेवावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८ श्री. तुकाराम बाजीराव गव्हाणे, कायम कंत्राटी कर्मचारी (५९८) विद्युत विभाग यांना वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५५ प्रस्ताव यापुर्वी दोनदा नामंजुर झाला आहे. प्रस्ताव नियमात बसत नाही म्हणून नामंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.९ श्री साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटांसाठी व MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी कर्मचारी उपलब्धता व त्यासाठीचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५५६** शीर्षकात MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी व साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटासाठी आवश्यक कर्मचारी व अंदाजे खर्चाबाबत उल्लेख आहे. टिपणीमध्ये १५६ जादा स्टाफ किती वाढीव खाटासाठी लागत आहे याचा काही उल्लेख नाही. माहिती अपुर्ण आहे. अर्धवट माहिती देऊन प्रस्ताव समितीसमोर सादर करणे आणि विषय तातडीचा आहे म्हणून लवकर मंजूरी द्यावी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विनंती करणे हे बरोबर नाही. हॉस्पिटलमधील सेवानिवृत्त, मयत झालेले कर्मचारी व सेवा सोडून गेलेले कर्मचारी यांची संख्या मोघम आहे.

स्ट्रॅक्चर ऑडीटचा रिपोर्ट अद्याप प्राप्त झालेला नाही, अशी माहिती देण्यात आली.

दि.२०/७/२०२२ रोजीचे प्रस्तावात फक्त १५ कर्मचा-यांची मागणी का करणेत आली, १५६ कर्मचा-यांची मागणी का केली नाही, असा प्रश्न पडला.

सविस्तर खुलाश्यासह प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.१०** श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असलेल्या वैद्यकीय सेवा आकारांच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.५५७** संस्थानचे अधिनियमाचे उद्दीष्ठ लक्षात घेता सध्या असलेले दर पुढील एक वर्षाकरीता कायम ठेवण्यात यावा. दरवाढीचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.११** श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.६०,३७,०७४/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५५८** विषय नं.११ व १२ मध्ये दिनांक २२.१२.२०१६ रोजी समितीने निर्णय क्र.९४४ अन्वये साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय उपचार व औषधे मोफत देणेबाबत मंजूरी दिल्याचा उल्लेख आहे. परंतु दर महिन्याचा खर्चाचा अहवाल स्वतंत्रपणे समितीसमोर मंजूरीसाठी किंवा मान्यता देणेसाठी किंवा नोंद घेण्यासाठी ठेवण्यात यावे असे निर्देश दिल्याचे निर्णय दाखविण्यात यावे.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.१२** श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.९३,७७,७२०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५५९** वरील निर्णय क्र.५५८ प्रमाणे निर्णय झालेला आहे. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.१३** संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर उपलब्ध करणेबाबत.

**निर्णय क्र.५६०** टीसीएस कडून प्राप्त झालेला दि.२० जुन,२०२२ रोजीचा अभिप्राय व प्रस्तावाचे अवलोकन केल्यानंतर क्लाऊड सर्व्हरची सेवा निर्णय क्र. ६१३ (१६) दि. ५.१०.२०१८ प्रमाणे दोन वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. (म्हणजे १५.१०.२०२३ पर्यंत)

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थानचे नावाशी साम्य असणा-या वेबसाईटव्दारे देणगी जमा करणारे तसेच वेबसाईट, फेसबुक, इन्स्टाग्राम यावर साई नावाने असलेल्या अकाऊंटबाबत.**

**निर्णय क्र.५६१** **श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट व श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी या नावाने अन्य कोणालाही कामकाज करता येत नाही. कारण श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट (शिर्डी) अधिनियम-२००४ अन्वये फक्त याच संस्थानला अधिकार दिलेले आहे. त्यामुळे यादीप्रमाणे शिर्डी पोलीस स्टेशनला एफआयआर दाखल करण्यात यावा.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१५** **संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराची निविदेबाबत.**

**निर्णय क्र.५६२** **निम्नतम निविदा दरधारक श्री.रुषीकेश भरत सदाफळ यांचेशी समितीने व्हीडीओ कॉलव्दारे वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी रक्कम कमी करुन रु.१३ लाखामध्ये सदर काम करुन देण्यास मौखीक संमती दली त्यामुळे सदर प्रस्ताव रु.१३ लाखामध्ये काम करुन घेण्यास मंजुरी दिली. त्यांचेकडून लेखी घेण्यात यावे. कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६** **संस्थानमार्फत करण्यात येणारे तातडीचे व इतर कामांकरीता आर्किटेक्ट पॅनल करणेसाठी विहीत पध्दतीने निवडलेले आर्किटेक्ट पॅनल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर.**

**निर्णय क्र.५६३** **श्री साईबाबांचे भक्तमंडळापैकी संस्थानसाठी सेवाभावनेने आर्किटेक्ट म्हणून काम करण्यास अनेक लोक उपलब्ध होऊ शकतात. या कामासाठी सशुल्क आर्किटेक्ट नेमण्याची गरज नाही त्यामुळे सदर प्रस्ताव नामंजूर केला आहे. सोबतच भक्तमंडळापैकी अनुभवी, तज्ञ व इच्छुक लोकांकडून Expression of interest from donors मागविण्यात याव्यात. अर्जामध्ये या कामासाठी आवश्यक अर्हता व अनुभव याचा उल्लेख करण्यात यावा. तसेच त्यांना अपेक्षीत मानधन देखील अर्जामध्ये नमुद करुन घ्यावे. या निविदेमध्ये उल्लेखीत मानकांचा त्या पत्रामध्ये समावेश करण्यात यावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१७** **साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतीचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतीचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षीत रु.१४,३४,५२,५४६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६४** **साई धर्मशाळा इमारतीचे बांधकाम ११ वर्षापुर्वी झाल्यामुळे दुरुस्ती होणे अपेक्षीत आहे त्यासाठी संबधीत देणगीदार श्री.के.व्ही.रमणी हे जर सदर काम देणगी म्हणून करुन देण्यास तयार असतील तर त्यांचेकडून ते काम करुन घेता येईल. ते तयार नसतील तर अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे त्यानंतर मग प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

विषय नं.१८ शिर्डी व परिसरातील झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्धवलेल्या पुर सदृष्य परिस्थितीमुळे श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील जनरेटर रुमचे पाठीमागील व पश्चिमेकडील कम्पांऊंड भींत पडल्याने सदर ठिकाणी नव्याने आर.सी.सी. रिटेनिंग वॉल बांधणेकामी येणारे रक्कम रु.३७,०८,१७३/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६५ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर जागेचे निरिक्षण करुन इतर काही पर्याय आहेत का याचा सविस्तर अहवाल सभेपुढे सादर करावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१९ श्री साईबाबा संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेले सोने चांदीच्या वस्तु वितळून उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी/पेन्डंट बनविण्यास येणा-या खर्चासंबधीत माहिती शासनास कळविणेबाबत.

निर्णय क्र.५६६ विषय तातडीचा नाही तहकुब.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.२० संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने चांदी वस्तू कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी सोने-चांदी मुल्यांकनकार यांना मासिक मानधनावर दोन वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.५६७ विषय तातडीचा नाही तहकुब.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.२१ मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामाची थकीत रक्कम रु.८.१७ कोटी मात्र आदा केलेचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

निर्णय क्र.५६८ विषयाचे अवलोकन केले.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.२२ माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.५६९ तक्त्यामधील अ.नं.३ मधील नमुद पाच लाखाचे आतील खर्च मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केल्याचा उल्लेख आहे. सभेसमोर फक्त नोंद घेण्यासाठी प्रस्ताव सादर केल्याचा उल्लेख आहे. सदरहु खर्च मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला सदरहु खर्च कोणत्या अति तातडीच्या कामासाठी केला आहे. बजेटमध्ये त्याची तरतुद होती किंवा नाही. तसेच अधिनियमाचे कलम-१४ उपकलम-४ परिच्छेद क्र.२ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे त्वरीत कार्योत्तर मान्यतेसाठी सदरहु खर्चाचा प्रस्ताव समितीसमोर ठेवला होता किंवा नाही, याचे माहितीसह सदर प्रस्ताव फक्त नोंद घेण्यासाठी नव्हे तर मान्यतेसाठी पुन्हा सादर करावा. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

**विषय नं.२३** संस्थानचे १२५ वाहने, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन पुरवठयाबाबत स्वयंपुर्ण होणेकरीता अंतर्गत इंधन व्यवस्था सुरु करणेबाबत.

**निर्णय क्र.५७०** दुस-याला विकण्यासाठी इंधन खरेदी करणे हे संस्थानचे अधिनियमातील उद्दीष्ठांपैकी उद्दीष्ठ नाही. बाजारात इंधन पुरवठा पंप उपलब्ध असतांना भक्तांना इंधन उपलब्ध करुन देण्याची गरज संस्थानला नाही. म्हणून प्रस्ताव नामंजूर.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२४** नगरसूल रेल्वेस्टेशन ते शिर्डी साई मंदिर बस सेवा पुर्ववत चालू करणेस तसेच भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५७१** सदर प्रस्तावात राज्य परिवहन महामंडळ (एसटी) यांचेकडून ते सदर सेवा पुरविण्यास तयार आहेत का याबाबत चौकशी केल्याचा उल्लेख नाही. जिल्हाधिकारी यांचे माध्यमाने सदर विकल्पाचा विचार करुन राज्य परिवहन महामंडळाकडून शक्य न झाल्यास याबाबत फेर प्रस्ताव सादर करावा.

कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२५** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकरीता स्कुल बस सेवा सुरु करणेबाबत.

**निर्णय क्र.५७२** सदर सेवा पुरविण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ (एसटी) यांचेशी पत्राव्यवहार करुन चर्चा करावी. तसेच पुरेशी विद्यार्थी संख्या नसतांना सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रस्ताव नामंजूर.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२६** अगरबत्ती विक्री करण्यासाठी स्टॉल लावणेस परवानगी मिळणेबाबत मा.सौ.शालीनीताई रा.विखे पाटील, विश्वस्त, जनसेवा, फौंडेशन, लोणी बु., ता.राहाता, जि.अहमदनगर यांचेकडील पत्र जा.नं.९३/२२, दि.२८.०९.२०२२.

**निर्णय क्र.५७३** निविदेची मुदत संपली, दिलेला कालावधी संपला, समितीचे निर्णयाप्रमाणे जागा खाली करुन घेतली पुन्हा काही निविदा त्यांना दिलेली नाही. अशा परिस्थतीत त्यांना संस्थेची जागा उपलब्ध करुन देणे नियमात बसत नाही. प्रस्ताव नामंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२७** श्री साईबाबा महाविद्यालय – प्राध्यापकांना मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.५७४** प्रस्ताव मंजुर. मात्र प्रस्तावातील परिशिष्ठ ब मधील अ.नं. १ खालील प्रमाणे दुरुस्त करण्यात यावा.

१. अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती किंवा त्यांचे नामनिर्देशीत समिती सदस्य

जाहिरात देण्यापुर्वी प्रारुप समिती अध्यक्ष व सदस्य यांचेकडून चक्रिय पध्दतीने मंजूर करुन घेण्यात यावे. (कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

**विषय नं.२८** श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन) औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी एकुण ११ नग नवीन रोलींग शटर्स तयार करुन बसविणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५७५** प्रथमत; सदरचे काम Expression of interest from Donors कडून संभाव्य खर्चासह लेखी मागविण्यात यावे. त्यासाठी आवश्यक माहिती प्रसिध्द करण्यात यावी. व कोणी तयार नसतील तर फेर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.२९** संस्थानचे विद्युत विभागासाठी दैनंदिन मेंन्टन्स कामासाठी साहित्य खरेदीकामी प्राप्त न्युनतम दर माहितीस्तव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.५७६** जीईएम प्रणाली मध्ये नोंदणी करुन प्रक्रिया राबविण्याबद्दल निर्देश देण्यात येत आहे. प्रस्ताव नामंजूर.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.३०** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रिक्त पदावर Ad-hoc पध्दतीने निदेशक नेमणूक करणेबाबत.

**निर्णय क्र.५७७** तहकुब.

(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.३१** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९(RTE Act-2009) अन्वये इयत्ता १लीचे एकुण १७६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५७८** तहकुब.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३२** सन २०२३-२४ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी उक्त्या मजुरी दराची अंदाजे रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५७९** तहकुब.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.३३** पिंच्याक सिलॅट (मार्शल आर्ट) राष्ट्रीय स्पर्धा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मध्ये घेण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत व त्या अनुषंगाने सुविधा मिळण्याबाबत.

**निर्णय क्र.५८०** संस्थानचे अधिनियमाचे उद्दीष्ठामध्ये बसत नाही म्हणून प्रस्ताव नामंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.३४** **दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ट "अ" मध्ये नमूद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वेतन मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव.**

**निर्णय क्र.५८१** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८२** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री. शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५८३** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३७** **श्री. विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५८४** **अधिनियमाचे कलम 14 (2) (a) (ii) अनुसार शिस्त व भंग विषयक कार्यवाही करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे आहे. म्हणून त्यांनी निर्णय घेऊन अहवाल समिती समोर सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३८** **श्री. शेखर विजयराव कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५८५** **श्री. शेखर विजयराव कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांना वैयक्तिक सुनावणीसाठी पुढील समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३९** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम–२०१३ नुसार रजा, सुट्ट्या लागू केलेबाबत.**

**निर्णय क्र.५८६** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४०** **बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेबाबत.**

**निर्णय क्र.५८७** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.४१** **साईभक्तांना देण्यात येणा-या कॉट/लॉकर्स व अनुषंगीक सेवा पुरविण्याचे सेवा आकारामध्ये वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८८** **तहकुब.** **(कार्यवाही-साई धर्मशाळा)**

---

**विषय नं.४२** **सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणेकरीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करणेसाठी पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५८९** **तहकुब.** **(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.४३** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील आऊटसोर्स ठेकेदारामार्फत ८० ते १०० टक्के गैरहजेरी असलेले आऊटसोर्स कर्मचारी कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९०** **आऊटसोर्स कर्मचारी हे नियमाप्रमाणे संस्थानचे आस्थापनेवरील नाही. जर मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतील तर त्या आदेशास अधिन राहून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अख्यत्यारीतील बाब असल्यास योग्य तो निर्णय घ्यावा. (कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास्थान)**

---

**विषय नं.४४** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाई परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर.**

**निर्णय क्र.५९१** **मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे तसेच दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची पाहणी करुन उचित कार्यवाही करावी.** **(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१**

**निर्णय क्र.५९२** **आजचे सभेतील विषय क्र.५ संबधी माहिती घेतांना असे निदर्शनास आले की, साईनाथ रुग्णालयात काही वैद्यकीय अधिकारी आर.एम.ओ. म्हणून नेमणूकीस असुन कंन्सलटंट म्हणून काम करुन आर.एम.ओ.चे वेतन व अधिक कंन्सलटंट म्हणून प्रोत्साहन भत्ता घेत आहेत. ते फक्त ऑनकॉल येऊन कंन्सलटंट म्हणून काम करतात व आर.एम.ओ.म्हणून पुर्णवेळ रुग्णालयात उपस्थित नाही. या विषयावर भांडण करुन काही डॉक्टर सोडून गेले आहेत. त्यामुळे आर.एम.ओ. यांची कमतरता भासते, या विषयावर आवश्यक संपुर्ण माहितीसह अध्यक्ष यांचेकडे अहवाल पाठवावा. जेणेकरुन समितीमध्ये विषय ठेवण्याचा विचार करता येईल.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२**

**निर्णय क्र.५९३** वाहन विभागाकडे एकुण १५ बसेस सध्या वापरण्यासाठी योग्या आहेत परंतु वापरात नाहीत. अशी माहिती दिली. सदर बसेसचा उपयोग कसा करता येईल आणि जरबसेसची गरज नसल्यास सदर बसेस विक्री करण्याचा विचार करण्याची गरज आहे का याचा प्रस्ताव सादर करावा.

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३**

**निर्णय क्र.५९४** तदर्थ समितीने कार्यभार घेतल्यानंतर संस्थानचे वतीने संस्थानचे मालमत्तेची माहिती सध्या चालू असलेली भरती प्रक्रिया मालमत्ता व दायित्व खरेदी प्रक्रिया संस्थानचे थकबाकी इत्यादीची माहिती दिलेली नाही. मागील महत्वाचे जे ठराव आहेत ते निदर्शनास आणून दिलेले नाहीत. विविध पदाची भरती प्रक्रिया, वस्तु व सेवा घेण्याची प्रक्रिया आणि वेतनेतर भत्ते जे नियमीत पणे होतात ते सोडून ५० लाखापेक्षा अधिक रकमेचे वितरण समितीची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. दरम्यान याबाबत कुठलाही स्पष्ट आदेश पाहिजे असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीचे अध्यक्ष यांचेकडे लेखी सादर करावे.

समितीचे अध्यक्ष यांनी दि.२१ ऑक्टोंबर, २०२२ च्या पत्रान्वये दि.१२.१०.२०२१ रोजीच्या तदर्थ समितीचे बैठकीत निर्णय क्र.१६८ चे अंमलबजावणीबाबत सविस्तर माहिती पाठविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आलेले होते. मात्र अद्याप त्याबाबतची माहिती देण्यात आलेली नाही.

**(कार्यवाही- सर्व विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४**

**निर्णय क्र.५९५** उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की पुजारी भरती प्रक्रिया मध्ये अंदाजे ३१ अर्ज प्राप्त झालेले आहे. पुजारी, उप पुजारी, विनावादक तबला वादक, पुजा-यांची नेमणूक उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, अर्ज बोलविण्याची प्रक्रिया पुर्ण झाली. पुढील प्रक्रिया प्रलंबीत आहे. दरम्यानचे कालावधीत सादर केलेल्या प्रारुपाप्रमाणे जी काही प्रक्रिया होणार आहे. ती प्रस्तावीत करावी व त्याबद्दल समितीची मान्यता घेतल्याशिवाय कोणतीही भरती प्रक्रिया राबवु नये. भरती प्रक्रिया ज्या स्तरावर असतील त्याची आहे ती परिस्थिती जैसे-थे ठेवण्यात यावी. **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५**

**निर्णय क्र.५९६** संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलसाठी लागणारे औषधे, शिल्लक साठा, आवश्यक खरेदी व खरेदीच्या प्रक्रियेची सद्यस्थिती याबाबत औषधे खरेदी निविदा प्रक्रिया समितीसमोर निविदा प्रक्रिया राबवून निविदा मसुदा समितीपुढे मान्यतेसाठी सादर करावा.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६**
**निर्णय क्र.५९७** संस्थान कर्मचा-यांना गणवेश पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. कार्यादेश देणे बाकी आहे. पुर्वी गणेवश देणेकामी गणवेश भत्ता देणेबाबत निर्णय समितीने घेतला होता. त्यामुळे आता प्रक्रिया निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कार्यादेश दिला आहे. असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले. १४० साडया पुरवठादाराने पुरवठा केल्याचे सांगीतले आहे. सद्यस्थितीत पुरवठा व वितरण यास स्थगिती देण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुर्वी तदर्थ समितीने घेतलेला निर्णय नंतरचे समितीने बदलेला असल्यास त्याची माहिती तसेच काढलेल्या निविदा आणि संबधीत दस्तऐवज अध्यक्ष व सदस्य यांना पाठवावा. आणी पुढील सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७**
**निर्णय क्र.५९८** दि.१७.१०.२०२२ रोजी अध्यक्ष यांनी पत्र पाठवुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून रविवार व गुरुवारचे दिवशी राखीव वेळेत कोणाकोणाकडून शॉल्स घेऊन ठेवल्या आहेत याची माहिती बोलविली तसेच त्याच दिवशी वेळे अभावी माहिती देऊ शकत नाही असे उत्तर देण्यात आले. परंतु आजपर्यंत तशी माहिती दिली गेली नाही. याबाबत पुर्तता न झाल्यामुळे तीन दिवसात त्याची पुर्तता व यापुर्वी पुर्तता न झाल्याबाबत खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्ष व सदस्य यांचेकडे पाठवावा.

---

**वरील निर्णय क्र.५४८ ते ५९८ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ.१२.१५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**